बाप्पा मोरया...

मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.in
» पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२३। पान १

# कर संकलन विभागाचा आज कर संवाद!

## युपिक आयडी, सर्वेक्षणाची मालमत्ता धारकांना मिळणार सविस्तर माहिती

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहरातील मालमत्ता धारकांसाठी सातत्याने नव-नवीन उपक्रम राबवणाऱ्या कर संकलन व कर आकारणी विभागाचा कर संवाद दिवसेंदिवस यशस्वी होत आहे. या कर संवादमध्ये मालमत्ता धारकांचे प्रश्न 'ऑन दी स्पॉट' सोडविण्यात येत आहेत. आज शनिवारी (दि. २३) सकाळी साडे अकरा वाजता कर संवादचे आयोजन करण्यात आले आहे. या संवादमध्ये प्रामुख्याने युपिक आयडी, मालमत्ता सर्वेक्षण, करामधील सवलत याबद्दल माहिती देण्यात येणार आहे, असे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख






यांनी सांगितले आहे. करदात्यांचे विविध प्रश्न, त्यांना करासंदर्भात येणाऱ्या अडचणी, मनातील शंकांची सोडवणूक करण्यासाठी जन संवाद सभेच्या धर्तीवर ऑनलाइन पध्दतीने 'कर संवाद'चे आयोजन करण्यात येते. हा संवाद फेसबुक, युट्यूबच्या माध्यमातून होणार आहे. तसेच ज्यांना ऑनलाईन उपस्थित राहता येणार नाही, अशा नागरिकांनी महापालिकेमधील कर संकलन विभागाच्या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित रहावे. या कर संवादमध्ये पालिकेच्या वतीने सुरू असलेल्या मालमत्ता सर्वेक्षणाची आणि मालमत्तांना युपिक आयडी (युनिक प्रॉपर्टी आयडेंटिफिकेशन कोड म्हणजेच विशिष्ट मालमत्ता क्रमांक) इत्यंभूत माहिती देण्यात येणार आहे. महापालिकेच्या सर्व सेवा तसेच शासनाचे इतर विभाग यांच्यात समन्वय राहण्यासाठी या युपिक आयडीचा वापर केला जाणार आहे. सध्या देशात व्यक्तीचा जसा आधार क्रमांक हा युपिक आयडी म्हणून वापरला जातो, तसाच आता मालमत्तांसाठी युपिक आयडी वापरला जाणार आहे. त्यामुळे मालमत्तेची सर्व माहिती व मालमत्तेशी निगडित सर्व सेवा एकाच क्लिकवर उपलब्ध होणार आहेत. याचा नागरिकांना कसा फायदा होणार आहे, याबाबत सर्व माहिती देण्यात येणार आहे. उद्याच्या कर संवाद संदर्भात कर संकलन विभागाच्या वतीने फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करण्यात आली आहे. मात्र, या ऑनलाईन कर संवादमध्ये ज्यांना उपस्थित रहाणे शक्य नसेल अशा नागरिकांनी फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्रामच्या कमेंट बॉक्समध्ये आपले प्रश्न आजच विचारु शकता. या प्रश्नाची उत्तरे कर संवादमध्ये देण्यात येतील.

> **“ मालमत्ता धारकांना दर्जेदार आणि घर बसल्या कर भरण्यासह विविध सुविधा कर संकलन विभागाच्या वतीने देण्यात येत आहेत. मात्र, त्यांच्या काही अडचणी असल्यास त्या अडचणींचा कर संवादमध्ये तत्काळ निपटारा करण्यात येत आहे. या कर संवादाला शहरातील मालमत्ताधारकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. उद्याच्याही कर संवादमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे.**
>
> **– नीलेश देशमुख, सहाय्यक आयुक्त,**
> **कर संकलन व कर आकारणी विभाग,**
> **पिंपरी चिंचवड महानगरपालिका**


# गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी शहरातील वाहतुकीत बदल

## पिंपरी चौकाकडून शगुन चौकाकडे जाणारा मार्ग बंद

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** गणेशोत्सव काळात मिरवणूक निघत असतात. पाचव्या, सातव्या, नवव्या व दहाव्या किंवा शेवटच्या दिवशी गणेश मूर्तींचे विसर्जन केले जाते. त्यामुळे शहरातील व पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या कक्षेतील काही रस्त्यांवर शनिवारी (ता. २३) पिंपरी व दापोडी वाहतूक विभागातील काही भागात बदल केला आहे. या भागांसह अन्य भागातील वाहतुकीतही सोमवार (ता. २५), बुधवार (ता. २७) आणि गुरुवारी (ता. २८) बदल केला जाणार आहे, असे पोलिस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी कळविले आहे. २३, २५ व २८ सप्टेंबर दुपारी दोन ते रात्री अकरापर्यंत

बंद मार्ग : पिंपरी चौकाकडून शगुन चौकाकडे जाणारा मार्ग बंद. र्यायी मार्ग : पिंपरी पुलावरून उजवीकडे वळून भाटनगर मार्गे. मोरवाडी मार्गे एम्पायर इस्टेटच्या मदर टेरेसा ब्रिजवरून काळेवाडी मार्गे.

बंद मार्ग : काळेवाडी पुलावरून डीलक्स चौक, कराची चौकाकडे जाण्यास बंदी. पर्यायी मार्ग : काळेवाडी



पुलावरून उजवीकडे वळून जमतानी चौक व गेलार्ड चौकाकडे महात्मा फुले कॉलेज, डेअरी फार्म-मुंबई पुणे महामार्ग मार्गे.

बंद मार्ग : पिंपरी चौकातून गोकूळ हॉटेलकडे जाण्यास बंदी. पर्यायी मार्ग : पिंपरी सर्विस रोडने क्रोमा शोरूम मार्गे. दापोडी विभाग

२३, २५ व २८ सप्टेंबर रोजी दुपारी दोन ते रात्री अकरापर्यंत

बंद मार्ग : फुगेवाडी- दापोडी ओव्हरब्रीज मार्गे शितळादेवी चौकाकडून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकाकडून पुण्याकडे जाणारा मार्ग. पर्यायी मार्ग : शितळादेवी चौकातून सांगवी मार्गे. फुगेवाडी चौकातून हॅरिस ब्रिजच्या अंडरपासमधून बोपोडी मार्गे. सांगवी विभाग

२५ सप्टेंबर रोजी दुपारी चार ते रात्री बारापर्यंत

बंद मार्ग : कृष्णा चौकाकडून फेमस चौकाकडे जाणारा मार्ग बंद. पर्यायी मार्ग : पाण्याची टाकी जुनी सांगवीमार्गे सांगवी महात्मा फुले ब्रिजमार्गे. बंद मार्ग : माहेश्वरी चौकाकडून माकण हॉस्पिटल चौक जुनी सांगवीकडे जाणारा मार्ग. पर्यायी मार्ग : बँक ऑफ महाराष्ट्र जुनी सांगवी मार्गे औंध किंवा पाण्याची टाकी जुनी सांगवी मार्गे सांगवी महात्मा फुले ब्रिज मार्गे.


बंद मार्ग : कृष्णा चौकाकडून साई चौक ते माहेश्वरी चौकाकडे जाण्यास बंदी.

पर्यायी मार्ग : काटेपूरम चौकातून डावीकडे वळून मयूरनगरी-एमके हॉटेल उजवीकडे वळून ढोरे फार्म-बा. रा. घोलप-महात्मा फुले ब्रिज मार्गे.

# गणेश विसर्जन घाटांवर वैद्यकीय पथक!

## पिंपरी-चिंचवडमध्ये मूर्तिदान, निर्माल्य संकलनासाठी रथ

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महापालिकेच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांमार्फत मूर्ती, निर्माल्य संकलनाकरिता फुलांनी सजवलेले सुशोभीकरण रथ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच प्रभागांमध्ये मूर्ती संकलन केंद्र उपलब्ध असणार आहेत. नागरिकांनी आणि मंडळांनी गणेशमूर्ती दान कराव्यात, असे आवाहन महापालिकेने केले. घरगुती गणपतीचे विसर्जन नागरिकांनी शक्यतो घरी करण्यास व मूर्तिदान करण्यास प्राधान्य द्यावे. गणेश मंडळांनी गणेश मूर्तींचे विधिवत विसर्जन मंडपालगत कृत्रिम हौदामध्ये करण्यास प्राधान्य द्यावे. गणेश विसर्जनाच्या दिवशी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामार्फत मूर्ती आणि निर्माल्य संकलनाकरिता फुलांनी सजवलेले सुशोभीकरण रथ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नागरिकांनी, मंडळांनी गणेशमूर्ती दान कराव्यात. महापालिकेद्वारे संकलित केलेल्या गणेशमूर्तींचे विधिवत आणि पावित्र्य राखून विसर्जन करण्यात येणार असल्याचे महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले. महापालिकेने शहरातील सर्व विसर्जन घाटांवर भाविकांसाठी सुरक्षा, आरोग्य, आपत्तीच्या सोईसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मोशीतील इंद्रायणी नदी विसर्जन घाट, रावेत येथील जाधव विसर्जन घाट, थेरगाव चिंचवड पूल विसर्जन घाट, चिंचवड येथील सुभाष घाट, पिंपळे गुरव येथील पुण्यश्लोक अहल्यादेवी घाट, सांगवी येथील वेताळमहाराज घाट, वाकड गावठाण येथील विसर्जन घाट, वैभवनगर, पिंपरी येथील कृत्रिम विसर्जन घाट सज्ज आहेत. घाटांवर दिशादर्शक व स्थळदर्शक फलक, निर्माल्यकुंड, जीवनरक्षक, अग्निशामक यंत्रणा, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित ठेवली जाणार आहे. तसेच नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करावी. विसर्जन घाटांवर सुशोभीकरण करण्यात यावे, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित क्षेत्रीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांवर महापालिकेच्या वतीने वैद्यकीय पथकांसह सुसज्ज रुग्णवाहिका तैनात असणार आहेत. वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, सफाई कामगारांचा पथकात समावेश आहे. 'नागरिकांनी मूर्तिदान करावे. गणेशमूर्तींचे विधिवत, पावित्र्य राखून विसर्जन करण्यात येणार आहे', असे पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी म्हटले आहे.



### भाविकांसाठी सुरक्षेसाठी सुविधा

» महापालिकेने शहरातील सर्व विसर्जन घाटांवर भाविकांसाठी सुरक्षा, आरोग्य, आपत्तीच्या सोईसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मोशीतील इंद्रायणी नदी विसर्जन घाट, रावेत येथील जाधव विसर्जन घाट, थेरगाव चिंचवड पूल विसर्जन घाट, चिंचवड येथील सुभाष घाट, पिंपळे गुरव येथील पुण्यश्लोक अहल्यादेवी घाट, सांगवी येथील वेताळमहाराज घाट, वाकड गावठाण येथील विसर्जन घाट, वैभवनगर, पिंपरी येथील कृत्रिम विसर्जन घाट सज्ज आहेत.

# अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या थुंकी मुक्त रस्ता अभियान

## शर्मिला ठाकरे, प्रसाद लाड यांच्यासह अनेकांचा अभियानाला पाठिंबा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** जुनी सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवाचे औचित्य साधून 'थुंकी मुक्त रस्ता अभियान' राबविले असून, समाजातील विविध स्तरातून या अभियानाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे, उदयनराजे भोसले, भाजपचे आमदार प्रसाद लाड, उद्योजक विजय जगताप, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अतुल शितोळे यांच्यासह अनेकांनी या अभियानाला पाठिंबा दर्शवला आहे. अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा आरती राव यांनी सांगितले, की आज सर्वच रस्त्यांवर थुंकून रस्ते घाण झालेले पाहवयस मिळतात. हे चित्र समाजिक आरोग्याच्या दृष्टीने चांगले नाही. म्हणून लोकांमध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशाने आमच्या प्रशालेचे विद्यार्थी रस्त्यावर कुणी थुंकताना दिसले तर या लोकांना 'रस्त्यावर थुंकू नका', असे सांगतील. मात्र, तरीही त्या व्यक्तीने ऐकले नाही, तर विद्यार्थी आजूबाजूच्या लोकांना रस्त्यावर थुंकणाऱ्या व्यक्तीविषयी तक्रार करतील. जेणेकरून रस्त्यावर थुंकणाऱ्या व्यक्तीला संकोचल्यासारखे होईल. अशाप्रकारे हे अभियान कायमस्वरूपी चालणार आहे. हे अभियान 'थुंकी मुक्त रस्ता' चळवळ होण्यासाठी इतर शाळा, महाविद्यालये, नागरिकांनी या अभियानात सहभागी होऊन अरविंद एज्युकेशन सोसायटी प्रशाळेच्या या अभियानाला पाठींबा द्यावा.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे, उदयनराजे भोसले, भाजपचे आमदार प्रसाद लाड, उद्योजक विजय जगताप, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अतुल शितोळे यांच्यासह अनेकांनी या अभियानाला पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे या अभियानाला चळवळीचे स्वरूप प्राप्त व्हायला सुरुवात झाली आहे, ही स्वागतार्ह गोष्ट आहे. रस्त्यावर थुंकणाऱ्यांनीही आपल्यामुळे रस्ते विद्रुप होणार नाहीत, याची काळजी घ्यायला हवी. रस्त्यावरून जाणाऱ्या गाड्या, तसेच आपल्या चपलांच्या माध्यमातून ही थुंकी घरापर्यंत येऊन पोहोचते. त्यामुळे आपल्याच कुटुंबाचे आरोग्य बिघडते. हे टाळण्यासाठी विद्यार्थ्यां सोबतच समाजातील सर्व घटकांनी 'थुंकीमुक्त रस्ते' कसे होतील, या दृष्टीने जनजागृती करायला हवी.




> परदेशात गेल्यावर आपण तिथल्या रस्त्यांवर थुंकत नाही, मग आपल्याच इथल्या रस्त्यावर थुंकून इथले रस्ते का खराब करता ? 'थुंकीमुक्त रस्ते अभियाना'ला सर्वच शाळा, महाविद्यालयांनी पाठिंबा दर्शवून या अभियानात सहभागी व्हायला हवे. तरच या अभियानाचे 'थुंकीमुक्त रस्ते चळवळी'त रूपांतर होऊन रस्ते चकाचक दिसतील. पर्यायाने समाजाचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल.
>
> — आरती राव, अध्यक्षा, अरविंद एज्युकेशन सोसायटी, जुनी सांगवी.

> अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी राबविलेले 'थुंकीमुक्त रस्ता अभियान' ही आजच्या समाजाची गरज आहे. आपलं घर जसं स्वच्छ ठेवतो तसा आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली आहे. जर तुम्हाला कुणी रस्त्यावर थुंकताना दिसलं, तर 'कृपया रस्त्यावर थुंकू नका', असे आवाहन त्यांना करा. सर्वांनी या अभियानात सहभागी व्हावे.
>
> — शर्मिला ठाकरे

# पालिका-जलसंपदामध्ये पाण्यावरून शीतयुद्ध

## महापालिका प्रशासनाकडून जलसंपदा विभागाकडे वाढीव पाण्याची मागणी

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहराची लोकसंख्या ७१ लाखांच्या घरात असल्याने वाढीव पाण्याची मागणी महापालिका प्रशासनाकडून जलसंपदा विभागाकडे करण्यात आली आहे. मात्र लोकसंख्येचा फुगवटा दाखविताना पाणीगळतीकडे महापालिका प्रशासनाकडून सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे. शहरातील जुन्या आणि जीर्ण जलवाहिन्यांतून पाण्याची गळती होण्याचे प्रमाण सर्वाधिक असून शहरातील २५० किलोमीटर मुख्य जलवाहिन्यांपैकी ६० किलोमीटर अंतरातील जलवाहिन्यांतून पाणी गळती होत आहे. समान पाणीपुरवठा योजनेमुळे गळती रोखली जाईल, असा दावा केला जात असला तरी गळती रोखली जाणार नसून गळतीचे प्रमाण अल्प प्रमाणात कमी होणार आहे. त्यामुळे भविष्यात वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्याचे आव्हान महापालिका प्रशासनापुढे असणार आहे.



शहरात महापालिकेकडून समान पाणीपुरवठा योजना राबविली जात आहे. त्यासाठी शहराची विभागणी काही भागात करण्यात आली असून प्रत्येक भागासाठी स्वतंत्र जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजित आहे. जलवाहिनीवरील पाणीगळती रोखण्यासाठी जलकेंद्रातून मुख्य जलवाहिनीत सोडण्यात येणारे पाणी फ्लो मीटरद्वारे मोजले जात असून त्यामुळे जलवाहिनीत सोडलेले पाणी आणि प्रत्यक्षात पोहोचणारे पाणी याची माहिती महापालिका प्रशासनाला मिळत आहे. त्यातून साठ किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्यांमध्ये गळती असल्याचे आणि त्यातून लाखो लिटर पाणी वाहून जात असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले आहे. त्यानुसार महापालिकेकडून उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. पुण्यासाठी वार्षिक ११ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी मंजूर आहे. मात्र, प्रत्यक्षात महापालिका वार्षिक २० टीएमसी पाणी धरणातून घेते. त्यापैकी तब्बल चार टीएमसी पाण्याची जलवाहिन्यांतून गळती होते. म्हणजेच शहराला चार महिने पुरेल, एवढे पाणी सदोष वितरण प्रणालीमुळे वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे. जुन्या आणि जीर्ण जलवाहिन्यांमुळे पिण्याच्या पाण्याची तब्बल चाळीस टक्के गळती होत असल्याच्या वास्तवाकडे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत आहे. वर्षानुवर्षे ही गळती होत असताना ठोस उपाययोजना कागदावरच राहिल्या असून महापालिकेची भिस्त समान पाणीपुरवठा योजनेवरच आहे. योजनेच्या अंमलबजावणीनंतर गळतीचे प्रमाण कमी होईल, असा पाणीपुरवठा विभागाचा दावा आहे. मात्र गळती पूर्णतः थांबणार नाही, मोठ्या शहरात पाण्याची गळती होतच असते.

### शहरात पाण्याची गळती होतच असते


» जुन्या आणि जीर्ण जलवाहिन्यांमुळे पिण्याच्या पाण्याची तब्बल चाळीस टक्के गळती होत असल्याच्या वास्तवाकडे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत आहे. वर्षानुवर्षे ही गळती होत असताना ठोस उपाययोजना कागदावरच राहिल्या असून महापालिकेची भिस्त समान पाणीपुरवठा योजनेवरच आहे. योजनेच्या अंमलबजावणीनंतर गळतीचे प्रमाण कमी होईल, असा पाणीपुरवठा विभागाचा दावा आहे. मात्र गळती पूर्णतः थांबणार नाही, मोठ्या शहरात पाण्याची गळती होतच असते. योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतरही पंधरा टक्के गळती होत राहील. केवळ पाणी वितरणातील त्रुटी दूर होतील, असेही सांगितले जात आहे.

योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतरही पंधरा टक्के गळती होत राहील. केवळ पाणी वितरणातील त्रुटी दूर होतील, असेही सांगितले जात आहे. त्यामुळे गळती कायम राहणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे. 'समान पाणीपुरवठा योजनेमुळे गळती रोखण्यास मदत होणार आहे. या योजनेमुळे सर्व भागाला समन्यायी पद्धतीने पाणीपुरवठा होणार असून जलमापकांमुळे पाण्याचा वापरही नियंत्रित राहणार आहे', असे समान पाणीपुरवठा योजनेचे अधीक्षक अभियंता नंदकिशोर जगताप यांनी म्हटले आहे. शहराची लोकसंख्या २०४७ मध्ये १ कोटीपेक्षा जास्त होणार आहे. पाणीपुरवठ्याचे मर्यादित स्रोत पाहता या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्याचे आव्हान भविष्यात महापालिकेपुढे असणार आहे. सध्या शहराच्या दहा टक्के निवासी भागाला पाणीपुरवठ्याची समस्या भेडसावत असून, या प्रमाणात वाढ होईल, अशी चिंता महापालिकेच्या पर्यावरण सद्य:स्थिती अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

# गाव तिथे शाळा या संकल्पनेला आता छेद जाणार

## कमी पटसंख्येच्या शाळांवर घाला

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शाळेतील कमी पटसंख्या, त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक सोयीसुविधा पुरवण्यात येणाऱ्या अडचणी, कमी पटसंख्येमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण न होणे अशी कारणे देत राज्य सरकारने २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा समूह शाळांमध्ये रुपांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे गाव तिथे शाळा या संकल्पनेला आता छेद जाणार असून, समूह शाळांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी १५ ऑक्टोबरची मुदत देण्यात आली आहेत्या पाठोपाठ आता समूह शाळांचा विषय पुढे आला आहे. शिक्षण विभागाच्या




आकडेवारीनुसार राज्यात १ ते २० पटसंख्येच्या १४ हजार ७८३ शाळा आहेत. त्यात १ लाख ८५ हजार ४६७ विद्यार्थी, तर २९ हजार ७०७ शिक्षक आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कमी पटसंख्येच्या शाळा बंद करून, समूह शाळा निर्माण करण्याची प्रक्रिया राबवण्याचे आदेश दिले आहेत. नंदूरबार जिल्ह्यातील तोरमाळ, तर पुणे जिल्ह्यातील पानशेत येथे निर्माण करण्यात आलेल्या समूह शाळांच्या धर्तीवर राज्यात समूह शाळा विकसित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. समूह शाळेमध्ये नवीन शैक्षणिक धोरण, इतर अभ्यासगटांनी दर्जेदार शिक्षणासाठी सुचवलेल्या १८ पायाभूत सुविधा, पहिली ते पाचवीसाठी प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र शिक्षक आणि इयत्ता सहावी ते आठवीपर्यंत प्रत्येक विषयासाठी त्या विषयाचे विषय तज्ञ शिक्षक उपलब्ध असतील याबरोबर संगणक खेळ व इतर कला यासाठी स्वतंत्र शिक्षक, प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्र वर्ग खोली, त्याचबरोबर वाचनालय, संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, विविध कला संगीत यांसाठी बहुउद्देशीय कक्ष, खेळाचे मैदान-साहित्य, विद्यार्थी वाहतुकीसाठी बससेवा उपलब्ध करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. राज्य शासनाचा निर्णय शिक्षण हक्क कायद्याचे (आरटीई) उल्लंघन करणारा आहे. समूह शाळेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून १ किंवा ३ किलोमीटरच्या आत शाळा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे या निर्णयावर शिक्षण क्षेत्रातून टीका करण्यात येत आहे.

### नुकसानकारक निर्णय

» कमी पटसंख्येच्या शाळांतील विद्यार्थ्यांचे सामाजिकीकरण होत नाही हे कोणी सिद्ध केले. स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा खाजगी उद्योगांना दत्तक देणे आणि कमी पटसंख्येच्या शाळा नजीकच्या शाळेत समाविष्ट करणे हे निर्णय गोरगरीबांचे, ग्रामीण भागातील सरकारी शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान करणारे आहे. शिक्षण हक्क कायद्याला पायदळी तुडवणाऱ्या धोरणाचा निषेध आहे, असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य अध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले.

# शहरी गरीब योजनेच्या उत्पन्न मर्यादेत वाढ!

## आता वार्षिक उत्पन्नाची मर्यादा १ लाख ६० हजार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरातील गरजू आणि गरीब रुग्णांसाठी वरदान ठरणाऱ्या महापालिकेच्या शहरी गरीब योजनेच्या वार्षिक उत्पन्नात वाढ करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. या योजनेची वार्षिक एक लाखापर्यंतच्या उत्पन्नाची मर्यादा १ लाख ६० हजार एवढी करण्यात आली आहे. या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली असून मुख्य सभेच्या मंजुरीनंतर या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. शहरी गरीब वैद्यकीय सहाय्यता योजनेत काही सुधारणा करण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी महापालिका प्रशासनाकडून घेण्यात आला होता. बोगस लाभार्थ्यांवर नियंत्रण



ठेवण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले होते. त्यानंतर योजनेच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याचे नियोजित होते. यापूर्वी शहरी गरीब योजनेचा लाभ घेण्यासाठी वार्षिक उत्पन्न एक लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक होते. मात्र योजनेला मोठा प्रतिसाद मिळत असल्याने आणि बोगस लाभार्थ्यांचे अर्ज येत असल्याने वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याचे विचाराधीन होते. त्यानुसार तसा प्रस्ताव प्रशासनाकडून ठेवण्यात आला होता. त्यामुळे यापुढे आता १ लाख ६० हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे. दरम्यान, राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेच्या धर्तीवर या योजनेची वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्यात आल्याचा दावा आरोग्य विभागाकडून करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेचा लाभ या योजनेतील लाभार्थ्यांना देण्यास महापालिकेने प्राधान्य दिले आहे. राज्याच्या आरोग्य योजनेत लाभ मिळाला नाही तरच शहरी गरीब योजनेअंतर्गत उपचार होणार आहेत. त्यासाठी शहरात परिमंडळ स्तरावर तीन केंद्र स्थापन करण्याचे नियोजित आहे. दरम्यान, स्थायी समितीने वार्षिक उत्पन्नात वाढ करण्यास मान्यता दिली असली तरी मुख्य सभेच्या मान्यतेनंतरच त्याची अंमलबजावणी होणार आहे.


### ऑनलाइन अर्ज करणे बंधनकारक

» बोगस लाभार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले होते. त्यानंतर योजनेच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याचे नियोजित होते. यापूर्वी शहरी गरीब योजनेचा लाभ घेण्यासाठी वार्षिक उत्पन्न एक लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक होते. मात्र योजनेला मोठा प्रतिसाद मिळत असल्याने आणि बोगस लाभार्थ्यांचे अर्ज येत असल्याने वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढविण्याचे विचाराधीन होते. त्यामुळे यापुढे आता १ लाख ६० हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे.

# चांदणी चौकाबाबत मोठा निर्णय!

## मार्गाबरोबरच पादचारी पूलही उभारण्यात येणार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** चांदणी चौकातील उड्डाणपुलानंतरही पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यास अडथळा निर्माण होत असल्याने चार किलोमीटर लांबीचा पादचारी मार्ग करण्याचे नियोजित आहे. पादचारी मार्गाबरोबरच पादचारी पूलही उभारण्यात येणार असून, त्याबाबतचा आराखडा महापालिका प्रशासनाकडून तयार करण्यात आला आहे. महापालिका आणि राष्ट्रीय राज्य महामार्ग प्राधिकरणाच्या बैठकीत त्याबाबतचा निर्णय घेण्यात येणार आहे. चांदणी चौकातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. या उड्डाणपुलाचे उद्घाटन केंद्रीय भुपृष्ठ आणि दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गेल्या महिन्यात करण्यात आले. मात्र या उड्डाणपुलामुळे पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यास असंख्य अडचणी येत



असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे त्याबाबतचा आराखडा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. महापालिकेने यासाठी चांदणी चौकात अभ्यास करून समस्या आणि सुधारणा याचा आराखडा तयार केला आहे. महापालिकेला पादचारी मार्ग बांधण्यासाठी सुमारे १५ कोटी तर महामार्ग प्राधिकरणाला पादचारी पूल बांधण्यासाठी सुमारे १० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. असा एकूण २५ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. चांदणी चौक परिसरातील रस्त्यावर पादचारी मार्ग बांधणे, महामार्ग ओलांडण्यासाठी पादचारी पुलाची उभारणी, पादचारी पुलावर ये-जा करण्यासाठी जीने, बावधन ते कोथरूड या दरम्यान महामार्गाल समांतर पादचारी पूल, वेद भवनाच्या जवळ रस्ता ओलांडण्याची सुविधा असा हा आराखडा आहे. या आराखड्यासंदर्भात महापालिका आणि महामार्ग प्राधिकरणाची येत्या काही दिवसांत एकत्रित बैठक होणार आहे. महापालिकेकडून त्यांच्या हिश्शाचा खर्च देण्याची भूमिका घेण्यात आली आहे.

### रस्ता ओलांडण्यास अडचणी

» चांदणी चौकातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. या उड्डाणपुलाचे उद्घाटन केंद्रीय भुपृष्ठ आणि दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गेल्या महिन्यात करण्यात आले. मात्र या उड्डाणपुलामुळे पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यास असंख्य अडचणी येत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे त्याबाबतचा आराखडा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

# 'दगडूशेठ' गणपती मंदिराची थायलंडमध्ये हुबेहूब प्रतिकृती

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** लाखो गणेश भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीमंत दगडूशेठ गणपतीची ख्याती भारतातच नव्हे तर जगभरात आहे. जगभरात विविध ठिकाणी दगडूशेठ गणपतीच्या प्रतिकृतीचे पूजन करून गणेशोत्सव साजरा केला जातो. मात्र, आता चक्क थायलंड मधील फुकेत येथे पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिरासारखे हुबेहूब भव्य मंदिर उभारण्यात येणार आहे. थायलंडमधील फुकेत येथील रहिवासी पापाचसॉर्न मिपा यांच्या पुढाकाराने या मंदिराची प्रतिकृती तेथे साकारण्यात येत आहे. या मंदिराच्या छायाचित्राच्या फ्रेमचे अनावरण नुकतेच पुण्याचे सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या हस्ते झाले. यावेळी ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, अमर कोद्रे, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी, राजाभाऊ घोडके, ज्ञानेश्वर रासने, विलास रासकर यांसह विश्वस्त व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. पापाचसॉर्न मिपा या साध्या पत्र्याच्या घरात वास्तव्यास होत्या. मात्र, गणरायाच्या कृपेने आज त्यांची फुकेत मधील यशस्वी उद्योजिका म्हणून ओळख आहे. फुकेत ९ रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कंपनी ही त्यांची कंपनी आहे. गणरायाच्या कृपेने त्यांना यश मिळाल्याने त्या फुकेत येथे बाप्पाचे मंदिर उभारत आहेत. बांधकाम क्षेत्रात त्यांना मिळालेले यश हे दगडूशेठ गणेशामुळेच मिळाले, असल्याची भावना त्यांनी पुण्यात व्यक्त केली. थायलंडहून अनेकांना पुण्यात दर्शनासाठी येण्याची इच्छा आहे, मात्र अंतर खूप असल्याने शक्य होत नाही. याकरिता मी फुकेत येथे मंदिर उभारत आहे, असे त्यांनी सांगितले. भारतीय चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री मीनाक्षी शेषाद्री यांनी शुक्रवारी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी गणरायाची आरती देखील केली.